परिपत्रक.

क्र. उतंसं/जपतस/परिपत्रक/१०५/९३/
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नागपूर. दिनांक : ५.८.१९९३.

विषय : जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामाबाबत...

...

महोदय,

महाराष्ट्र राज्यातील जमाती प्रमाणपत्र तपासणीचे काम शासन आदिवासी विकास विभाग निर्णय क्र. सोयीसी-१६८४/[१९९१]/११, दिनांक २५.१.१९८५ अन्वये या संस्थेच्या अधिपत्याखालील नियुक्त राज्यस्तरीय समितीकडे दिलेले होते.

अनुसूचित जमातींना विविध स्तरांवर शासनाने सवलती जाहीर केलेल्या आहेत. साहजिकच अनुसूचित जमातींना दिलेल्या सोयी-सवलतींचा गैरफायदा घेण्याची प्रवृत्ती नामसदृश्य असलेल्या बिगर आदिवासी जातीच्या काही गटात मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. परिणामत: शासन/मध्यवर्ती शासन/अंगीकृत संस्था/महामंडळे/जिल्हा परिषदा इत्यादी कडून अनेक प्रकरणे जमातीच्या दाव्याची तिथळणी करण्यासाठी समितीकडे वेळोवेळी प्राप्त होतात. संस्थेतील जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामाचा दिवसेंदिवस वाढत असलेला व्याप लक्षात घेऊन सदर कामाचा निपटारा जलद व्हावा या उद्देशाने शासनाने सदर कामाचे विकेंद्रीकरणाचा निर्णय घेऊन पुणे, नाशिक व नागपूर येथे आदिवासी विकास विभाग निर्णय क्रमांक एसटीसी-१०९०/२३९४२/१८६/का. १, दिनांक ३.६.९२ व दिनांक ३०.१२.९२ अन्वये पुणे, नाशिक, नागपूर या तीन स्वतंत्र समित्यांची स्थापना केलेली आहे.

त्यानुसार नागपूर येथील समितीचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे असेल.

जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती.

| | |
|---|---|
| व. सु. पाटील,<br>१. उप संचालक [संशोधन] तथा अध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर विभाग, आदिवासी प्रशासकीय भवन, नागपूर-अमरावती रोड, प्रादेशिक परिवहन कार्यालया-समोर, नागपूर - ४४ ०० ०१. | नागपूर व अमरावती महसूल विभाग. |

वरीलप्रमाणे नव्याने समिती स्थापन झाली असल्याने यापुढे आपले कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या जमाती प्रमाणपत्रांची तपासणी या समितीकडून करण्यात येईल.

...२...